# महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१६

# **घोषणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २४ ते २६ सप्टेंबर, २०१६ या कालावधीत घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१६ च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती लवकरच मुंबईसह औरंगाबाद, नागपूर व पुणे या किंवा अन्य केंद्रांवर घेण्यात येतील. मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेत स्थळावर स्वतंत्ररित्या लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

२. लेखी परीक्षेद्वारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या प्रोफाईलमध्ये ऑनलाईन पध्दतीने लिंक ओपन झाल्यापासून आठ दिवसांच्या आत पाठविणे आवश्यक आहे. केवळ ऑनलाईन पध्दतीने भरलेले पसंतीक्रम विचारात घेण्यात येतील. अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदे नमूद करण्यात आली आहेत, तोच पसंतीक्रम अशा उमेदवारांकरिता गृहित धरला जाईल व तद्नंतर याबाबत उमेदवारांची कोणतीही निवेदने/ पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

३. प्रस्तुत परीक्षेत अर्हता प्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविलेल्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र. ३.८. पहावी.)

४. सदरचा निकाल आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

विजया पडते
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

मुंबई
दिनांक : ३० डिसेंबर, २०१६.